ePaper

महायुतीला तडे? बच्चू कडूनंतर सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केली नाराजी



वर्ष - 7 । अंक -55 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- पवना धरणातून गाळ काढला; साठवणक्षमतेत वाढ!
- सेवा, सुशासन व गरीब कल्याणासाठी भाजपाचे महा-जनसंपर्क अभियान


www.mahaenews.com | ।बुधवार, दि. 21 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## कुणी कितीही दावा करु द्या: 'न्यूज एरेना इंडिया' या संस्थे द्वारा 288 विधानसभा मतदारसंघाचा सर्वे

# पिंपरी-चिंचवडमध्ये वर्चस्व कुणाचे!

### » मावळ-पिंपरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे तर भोसरी-चिंचवड मतदार संघात भाजपाचेच आमदार

।पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात सध्या आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागल्याचे चित्र दिसून येत आहे. यासाठी राज्यातील प्रमुख पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. यासाठी बैठका, दौरे, मेळाव्यांचा सपाटा सर्वच राजकीय पक्षांनी लावला आहे. तर आगामी निवडणुकीत आपल्याच पक्षाला जास्त जागा मिळतील, असा दावा प्रत्येक राजकीय पक्षांकडून केला जात आहे. असे असतानाच आता राज्यात 'न्यूज एरेना इंडिया' या संस्थेचा सर्व्हे समोर आला आहे.**



'न्यूज एरेना इंडिया' या संस्थेने राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघाचा सर्वे केला आहे. आता जर विधानसभेच्या निवडणुका झाल्या तर जनता कुणाला कौल देणार, हे या सर्व्हेतून स्पष्ट करण्यात आहे. या सर्व्हेत मावळ, पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या विधानसभेत कुणाला बळ मिळणार हे स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, महाविकास आघाडी आणि महायुतीकडून जास्तीत जागा आपल्याला मिळतील, असा दावा केला जात आहे. या सर्व्हेतून मात्र पिंपरी, चिंचवड, मावळ आणि भोसरीबाबत काही वेगळेच चित्र समोर येत आहे. असे असतानाच आता राज्यात 'न्यूज एरेना इंडिया' या संस्थेचा सर्व्हे समोर आला आहे.

### सर्व्हेत चित्र मात्र काही वेगळेच




**» मावळ, पिंपरी या विधानसभा मतदारसंघाचे आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. तर चिंचवड व भोसरीत भाजपचे आमदार आहेत. दरम्यान, चिंचवडमध्ये पोटनिवडणूक झाली होती. त्यावेळी महाविकास आघाडीत बंड झाले नसते तर चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार असता असा दावा महाविकास आघाडीकडून केला जात होता. असे असले तरी नव्या सर्व्हेत चित्र मात्र काही वेगळेच दिसून येत आहे.**

---

# क्रांतिकारी चापेकर बंधूंच्या स्मारकासाठी ४१ कोटींचा निधी देणार!

### » मुख्यमंत्री शिंदे : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तातडीने शासनाकडे प्रस्ताव पाठवावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड येथे साकारण्यात येणाऱ्या क्रांतिकारी चापेकर बंधूंच्या स्मारक पूर्ण करण्यासाठी ४१ कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे स्मारकाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.**



बैठकीला खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंग, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे गिरीश प्रभूणे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, क्रांतिकारी चापेकर बंधूचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून देण्यात येईल. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तातडीने शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

यावेळी प्रभूणे यांनी स्मारकाच्या उभारणीची आतापर्यंतची वाटचाल मांडली. तसेच स्मारकाच्या उद्घाटनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करण्यात आले असून त्यांनी येण्यास मान्यता दिल्याचे सांगितले. पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखरसिंह यांनी स्मारकाच्या कामाचे सादरीकरण केले.

# येरवडा तुरुंगात कैद्यांमध्ये राडा!

## » वर्चस्वाच्या वादातून दोन गटात तुफान हाणामारी, अनेक जखमी

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**येरवडा कारागृहात कैद्यांच्या दोन गटात हाणामारी झाली. यामध्ये अनेक कैदी जखमी झाले आहेत. या प्रकरणी १६ कैद्यांविरुद्ध येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**

प्रकाश येवले, प्रणव रणधीर, विजय वीरकर, सचिन दळवी, मुकेश साळुंखे, श्री वाघमारे, आदित्य चौधरी, किरण गालफाडे, आकाश शिनगारे, विशाल खरात, रुपेश आखाडे, रोहित जुजगर, शुभम राठोड, अनराग कांबळे, मेहबूब शेख अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कैद्यांची नावे आहेत. कारागृह अधिकारी हेमंत इंगोले यांनी या संदर्भात येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. येरवडा कारागृहातील सर्कल क्रमांक तीन आणि बराक क्रमांक आठमधील कैद्यांमध्ये झालेल्या वादातून ही हाणामारी झाली. कैद्यांनी दगड आणि पत्र्याने एकमेकावर वार केले. कारागृहातील बराकीत वर्चस्वाच्या वादातून हाणामारीची घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिस उपनिरीक्षक अशोक काटे तपास करीत आहेत.

कुख्यात गज्या मारणे टोळीतील गुंडांचा येरवडा कारागृहात गोंधळ



येवरडा कारागृहात यापूर्वीही वर्चस्वाच्या वादातून घटना घडल्या आहेत. गेल्या महन्यात अशीच एक घटना येरवडा कारागृहात आधी घडली होती. यात कॅरम खेळण्याच्या वादातून कुख्यात गज्या मारणे टोळीतील गुंडांनी येरवडा कारागृहात गोंधळ घातला होता. गुंडांच्या हल्ल्यात एकाच्या डोक्यात पाट घातल्याने तो गंभीर जखमी झाला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### गुंडांमध्ये कॅरम खेळण्यावरून वाद

**» येरवडा कारागृहात वेगवेगळ्या बराकीत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केलेले वेगवेगळ्या टोळीतील ७०० ते ८०० गुंड आहेत. मारणे टोळी आणि इतर गुंडांमध्ये कॅरम खेळण्यावरून वाद झाला होता. त्या वेळी कारागृहातील रक्षकांनी भांडणे सोडवली होती. त्यानंतर सर्वांना बराकीत बंद करण्यात आले होते. रात्री तपासणी सुरू असताना गुंडांच्या टोळीत पुन्हा वाद उफाळून आला. या वेळी एकाने दुसऱ्या टोळीच्या गुंडाच्या डोक्यात पाट घातल्याने त्यात तो गंभीर जखमी झाला. कारागृह रक्षकांनी भांडणे सोडवून पुन्हा सर्व गुंडांची वेगवेगळ्या बराकीत रवानगी केली होती.**

---

# दौंड तालुका हादरला...
# डॉक्टरचीपत्नीमुलांसहआत्महत्या

## » मुलांचे मृतदेह आढळले विहिरीत

**। दौंड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुण्यातील दौंड तालुक्यातील वरवंड येथे एका डॉक्टरने पत्नी आणि दोन मुलांची हत्या करून स्वत: आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुका हादरला आहे.**

दौंड तालुक्यातील वरवंड येथून एका धक्कादायक घटना समोर आली आहे. एका डॉक्टरने आपल्या पत्नीचा गळा आणि आपल्या दोन मुलांना विहिरीत ढकलून देत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण दौंड तालुका हादरला आहे.

पत्नीच्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलले असल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. वरवंड येथील गंगासगर पार्कमध्ये रूम नंबर २०१ मध्ये राहत्या घरी ही घटना घडली आहे. डॉ.अतुल शिवाजी दिवेकर (वय ४२ ) आणि पत्नी पल्लवी (वय ३५) यांचे मृतदेह यांचे मृतदेह लटकलेल्या अवस्थेत घरी सापडले असून मुलगा अद्वित अतुल दिवेकर (वय ११ ) आणि मुलगी वेदांतिका अतुल दिवेकर (वय ७ ) यांचे मृतदेह विहिरीत आढळले आहेत. विहीर जवळपास १० परस इतकी खोल असून ४५ फूट एवढे पाणी असल्याने मुले वर काढण्यात मोठी अडचण येत असून स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.



### वरवंड परिसरात हळहळ

**» या घटनेने वरवंड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अचानक घडलेल्या घटनेने वरवंड गावावर शोककळा पसरली आहे. डॉ. अतुल दिवेकर हे व्यवसायाने गुरांचे डॉक्टर असून त्यांची पत्नी ही एका शाळेत शिक्षिका असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांना घटनस्थालावरून सूसाईड नोट मिळाली असून पुढील तपास करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.**

# पुणेकरांसाठी गूड न्यूज, कर्वे रस्त्यावरील ‘नो पार्किंग’ अखेर रद्द

**। दौंड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

कर्वे रस्त्यावरील ‘नो पार्किंग’ सरसकट रद्द करण्याचा आणि काही भाग वगळून दोन्ही बाजूंना ‘पार्किंग’ला परवानगी देण्याचा निर्णय सोमवारी घेण्यात आला. महापालिकेत झालेल्या संयुक्त बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी तसे आदेशही काढले. ‘गरवारे महाविद्यालयासमोरील महापालिकेच्या जागेत वाहनतळ उभारून तिथे ‘पे अँड पार्क’ करावे,’ अशी सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. पुणे व्यापारी महासंघ, कर्वे रस्ता व्यापारी संघटना आणि महाराष्ट्र नवनिर्माण जनाधिकार सेनेने केली होती.

पालिका आयुक्त विक्रमकुमार, वाहतूक उपायुक्त विजय मगर, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, रवींद्र बिनवडे, प्रकल्प विभागप्रमुख श्रीनिवास बोनाला, पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका, कर्वे रस्ता व्यापारी संघटनेचे ओमप्रकाश रांका, अजित सांगळे, महाराष्ट्र नवनिर्माण जनाधिकार सेनेचे प्रदेशाध्यक्ष हेमंत संभूस, विनिता ताटके, प्रियांका पिसे, रोहित गुजर, संदीप खर्डेकर, मंदार जोशी, गजानन थरकुडे आणि कोथरूड वाहतूक पोलिस निरीक्षक विश्वास गोळे आदी उपस्थित होते. ‘संभाव्य वाहतूक कोंडी टाळून ‘कॅरेज वे’ उपलब्ध आहे, अशा भागांमध्ये वाहने पार्किंगला परवानगी द्यावी. वाहतूक कोंडी होत नसलेल्या ठिकाणांची पाहणी करून तेथील ‘नो पार्किंग’चे फलक काढावेत. भविष्यातील पार्किंगची समस्या सोडविण्यासाठी गरवारे महाविद्यालयाच्या विरुद्ध बाजूला महापालिकेच्या जागेवर ‘पे अँड पार्क’ तत्त्वावर वाहनतळ सुरू करावा,’ अशी सूचना पालकमंत्र्यांनी केली.



### व्यावसायिकांना दिलासा

**» मेट्रो प्रकल्प, दुमजली उड्डाणपूल आणि अन्य विकासकामांसाठी २०१८पासून कर्वे रस्त्यावर दुतर्फा दोन मार्गिका बंद करून ‘नो पार्किंग’ करण्यात आले होते. आता त्यातून सवलत मिळणार असल्याने येथील व्यापारी, व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. कर्वे रस्त्यावरील व्यापारी पाच वर्षे नुकसान सहन करून प्रशासनाला साथ देत होते. मात्र, आता कर्वे रस्त्यावर कोणत्याही प्रकल्पाचे काम सुरू नाही. त्यामुळे त्वरित येथील ‘नो पार्किंग’ रद्द करावे, अशी आमची मागणी होती असे संभूस यांनी सांगितले.**

# पिंपरीमध्ये गद्दार दिन साजरा!

## खोके सरकार हाय हाय अशा घोषणांनी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने

### पन्नास खोके,महाराष्ट्राला धोके, गुजरात ओके :अजित गव्हाणे

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडी सरकारशी गद्दारी करणाऱ्या शिंदे गटांच्या खोके बहाद्दर विरोधात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथे “गद्दार दिवस” साजरा करण्यात आला. शहराध्यक्ष अजित गव्हाणे युवक अध्यक्ष इम्रान शेख,महिला अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या नेतृत्वात हे निषेध आंदोलन करण्यात आले.यावेळी युवकांच्या वतीने “पन्नास खोके,एकदम ओके”, “पन्नास खोके महाराष्ट्राला धोके”, पन्नास खोके युवकांना धोके”, “पन्नास खोके महागाई ओके”, “पन्नास खोके गुजरात ओके”, “खोके सरकार हाय हाय” अशा घोषणा देण्यात आल्या..**



यावेळी बोलताना अजित गव्हाणे म्हणाले ” बेरोजगारी महागाई नवीन उद्योग महिलांचे प्रश्न शेतकऱ्यांचे प्रश्न वाढती गुन्हेगारी या सर्व कसोटीवर हे खोके सरकार तोंडावर आपटले असून नागरिकांमध्ये या सरकार विषयी प्रचंड रोष आहे. आज या घडीला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर केल्यास निश्चितच संपूर्ण महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सरकार येईल असे ते म्हणाले. वेगवेगळ्या जाती धर्मामध्ये तेढ निर्माण करायचा अजेंडा हे सरकार राबवत असून सर्वसामान्य जनतेची कसलीही परवा न करता खोके सरकारचा तुघलकी कारभार जनता झेलत आहे.अशी जहिरी टीका अजित गव्हाणे यांनी केली.

यावेळी कविता अल्हाट म्हणाल्या “महाराष्ट्रातील पुरोगामी परंपरेला फाटा देत या सरकारची वाटचाल सुरू असून सातत्याने महिलांवर अत्याचार वाढत आहेत. महागाई आजवरच्या सर्वात उच्चांक गाठला आहे.महापुरुषांचा अपमान सातत्याने केला गेला आहे. जनता त्यांना धडा शिकवेल या भीतीने महापालिकेच्या निवडणुका मुद्दामून पुढे ढकलल्या जात आहेत असा आरोप त्यांनी यावेळी केलायावेळी बोलताना युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले “जनतेने लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या महाविकास आघाडी सरकारशी गद्दारी करून हे मिंधे सरकार स्थापन झाले आहे. हे सरकार स्थापन झाल्यापासून महाराष्ट्रात आराजकता निर्माण झाली असून सरकारचे अपयश लपवण्यासाठी विविध जाती- धर्मामध्ये तेढ निर्माण करणे, तरुणांना रोजगार न देता त्यांची माथी भडकवून त्यांना धर्मांधतेमध्ये अडकवणे. एखाद्या विशिष्ट समुदायाच्या विरोधात चित्रपट काढून समाजात फूट निर्माण करणे, या अजेंडावर हे सरकार काम करत आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून एका तरुणाची हत्या करण्यात आली हे या सरकारच अपयश आहे. महाराष्ट्रातील तरुणाची हक्काचे रोजगार गुजरातच्या घशात घालण्याचे महापाप या सरकारने केला आहे. काम एक रुपयाचं करायचं आणि शंभर रुपयाची जाहिरात करायची या सरकारचं पॅटर्न आहे. लोकशाही पद्धतीने आंदोलन करणाऱ्या आमच्या वरिष्ठ नेत्यांना अटक करून लोकशाही संपुष्टात आणण्याचा षडयंत्र हे सरकार करत आहे या सर्व गोष्टींमुळे मिंधे सरकारच्या नाकर्तेपणाचा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसतर्फे निषेध करतो.

### आंदोलनामध्ये यांचा सहभाग...

**यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे युवक शहराध्यक्ष इम्रान शेख,महिला अध्यक्ष कविता आल्हाट,मोहम्मद पानसरे, विजय लोखंडे, कार्याध्यक्ष निलेश निकाळजे,देवेंद्र तायडे, विकास कांबळे,ओम क्षीरसागर,मंगेश बजबळकर, सचिव मयूर थोरवे,मयूर खरात, मेघराज लोखंडे,अभिषेक जगताप,अजय पवार,पंकज भालेकर विशाल काळभोर कविता खराडे,सतीश चोरमेले तुकाराम बजबळकर,मंगेश बजबळकर, मिरा कदम,अर्जुन कदम,जावेद शेख,पंकज कांबळे,ज्योती गोफने, बाळासाहेब पिल्ललेवर,लता ओव्हाळ,मनीषा गटकळ पल्लवी पांढरे, विजय दळवी, दत्तात्रय जगताप,काशीनाथ जगताप,राजू खंडागळे,सचिन औटे, नितीन सूर्यवंशी,निर्मला माने,अनिल भोसले, नीलम कदम,माधव पाटील,विश्रांती पाडळे,संजय औसरमल,राजन नायर, रवींद्र सोनवणे,युवराज पवार, महेश माने,के. डी. कांबळे, सोनाली नितनवरे मुमताज इनामदार ,सपना कदम, रिजवणा सय्यद ,जया गवळी, वंदना जाधव यावेळी मोठ्या संख्येने युवक,महिला पदाधिकारी उपस्थित होते.**

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार!

## खेळाडूंसह गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील गौरव

। पिंपरी । महाईन्यूज

**चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक विद्यालय थेरगाव येथील राष्ट्रीय कबड्डी खेळाडू विद्यार्थिनींचा मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. खेळाडूंसह गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील गौरव खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते करण्यात आला.**

सत्कार समारंभासाठी उपायुक्त मनोज लोणकर,जिल्हा क्रिडा अपअधिक्षक महादेव करगावडे, माजी नगरसेवक अभिषेक बारणे, संतोष गुलाब बारणे, तानाजी बारणे, बाळासाहेब वाघमोडे, मुख्याध्यापक बाळासाहेब राठोड, दत्ता झिंजुर्डे, अनिता केदारी, प्रशिक्षक बन्सी आटवे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत सहा वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेणारी मनीषा रामराव राठोड, महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत चार वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेणारी भूमिका कमलेश गोरे, महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत तीन वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतलेली प्रतीक्षा कालिदास लांडगे, राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेत रौप्य पदक विजेती रेखा रामराव राठोड, महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत दोन वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी घेणारी श्रावणी विकास सावंत, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू रुपाली त्र्यंबक डोंगरे या खेळाडू विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत मुलींना शिकवण्याचे



काम या खेळाडू विद्यार्थिनींचे पालक करीत आहेत.

महापालिकेच्या शाळेत शिकून अशा प्रकारे चमकदार कामगिरी या खेळाडूंनी केली आहे. पिंपरी-चिंचवड माध्यमिक विद्यालय थेरगाव या शाळेतून महापालिकेच्या एक लाख रुपये बक्षिसाचे मानकरी ठरलेले दहावीचे गुणवंत विद्यार्थी प्रतीक्षा परशुराम कांबळे (92.20 टक्के), सिद्धी नारायण पवार (90.40 टक्के), आदित्य चंद्रकांत कांबळे (90.20 टक्के) यांचा देखील खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या प्रसंगी खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, “मी नगरसेवक असताना महापालिकेच्या माध्यमातून थेरगाव येथे माध्यमिक विद्यालयाच्या प्रशस्त व देखण्या इमारतीची उभारणी केली. त्याच शाळेतील विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर चांगली कामगिरी करीत आहेत.




# मोठ्या आपत्तीची चाहूल

**ईशान्येकडील राज्ये; तसेच गुजरात आणि राजस्थान वगळता अवघा देश मान्सूनच्या प्रतीक्षेत आहे. केरळ, कर्नाटक किनारपट्टी आदी भागांत मान्सूनचे आगमन झाले असले, तरी तिथेही पाऊस नाही. 'बिपर्जय' वादळामुळे मान्सूनची आगेकूच रोखली गेली. आता हे वादळ शमले असले, तरी अद्याप मान्सूनला पोषक वातावरण नाही. ती या आठवड्याच्या अखेरीस निर्माण होईल, असा अंदाज आहे. तो खरा ठरल्यास कदाचित पुढील आठवड्यात पाऊस सुरू होईल; परंतु तो आणखी लांबल्यास शेतकऱ्यांचीच नव्हे, तर सर्वांचीच चिंता वाढेल.**

गेली काही वर्षे सरासरीइतका पाऊस झाला असल्याने; तसेच पावसाळ्यानंतरही बिगरमोसमी पाऊस पडल्याने राज्यातील भूजलसाठा खोलवर जाण्याचे खरे तर काही कारण नव्हते. मात्र, पाण्याचा बेसुमार वापर, नासाडी आणि अपुरे नियोजन यांमुळे भूजलसाठा खाली चालला आहे, जलस्रोत आटत आहेत आणि धरणे कोरडी पडत आहेत. उजनी, कोयना, जायकवाडी यांसारखी मोठी धरणे शंभर टक्के भरूनही पूर्णपणे रिकामी झाली असून, पाणी वाचविण्याबद्दलची बेफिकिरी यातून अधोरेखित होते. तिन्ही बाजूंनी समुद्र आणि हिमालयाच्या पर्वतरांगा या विशिष्ट भूगोलामुळे देशात चार महिने पाऊस पडतो म्हणजे पडतोच. पडणाऱ्या पावसाचा थेंब न् थेंब वाचविण्याच्या गप्पा गेल्या वर्षांपासून आपल्याकडे मारल्या जात आहेत; प्रत्यक्षात त्यासाठीची व्यापक सुविधा निर्माण करण्यात यश आलेले नाही. अनेक सिंचन प्रकल्प कागदावरच राहिले आहेत किंवा अपूर्णावस्थतेत आहेत; शहरी



भागांत बहुतेक इमारती पर्जन्यसंचय करण्यासाठी सोयीच्या नाहीत; त्या तशा व्हाव्यात यासाठी जोरकस प्रयत्न होतानाही दिसत नाहीत. पंधरा दिवस पाऊस लांबल्याने मोठ्या जलसंकटाची चाहूल लागण्याचे कारण या नियोजनशून्यतेत आणि सार्वत्रिक निष्काळजीपणात आहे.

जमिनीचे आणि सागरी पृष्ठभागाचे तापमान, त्यांवरील दाब, वाऱ्याचा वेग आदी घटकांचा पावसावर परिणाम होत असतो. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढले, की 'एल निनो' हा घटक सक्रिय होतो; आणि त्यामुळे भारतातील पाऊसमान कमी होते, असा अनुभव आहे. यंदा 'एल निनो' सक्रिय राहण्याची चर्चा गेल्या तीन महिन्यांपासून सुरू आहे. ती लक्षात घेऊन धोरणकर्त्यांनी पाण्याच्या नियोजनासाठी वेळीच पावले उचलली असती, तर कदाचित सर्वच जलसाठे इतक्यात आटले नसते. पुण्यासारख्या शहरात पिण्याच्या पाण्याचे नियोजन करताना जुलैपर्यंतचा विचार केला जातो. त्याऐवजी ऑगस्टपर्यंतचा विचार करून नियोजन झाले असते, तर धरणांमध्ये थोडा अधिक पाणीसाठा राहिला असता. सर्व समाजघटकांकडे 'मतदार' म्हणून बघण्याची राजकीय नेत्यांच्या वृत्तीमुळे कोणताही मतदार दुखावू नये, यासाठी नजीकच्या भविष्यातील संकटाकडे काणाडोळा करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे आपल्याकडे खऱ्या अर्थाने 'आपत्कालीन नियोजन' होताना दिसत नाही. आता आणखी काही दिवस पावसाने ओढ दिल्यास पाणीटंचाई अधिक तीव्र होईल. त्यावेळी पाण्याचे नियोजन कसे केले जाणार हा प्रश्न आहे. तोपर्यंत पाऊस येईल आणि हे संकटच निर्माण होणार नाही, अशी आशा बाळगायला हरकत नाही; परंतु भीषण संकटाला सामोरे जाण्यासाठी नियोजन हवे. त्यासाठी किमान आता तरी पावले उचलायला हवीत; कारण 'एल निनो' सक्रिय झाल्याचा फटका पावसाळ्याच्या उत्तरार्धात बसेल, असे अभ्यासक सांगत आहेत. गेल्या काही वर्षांपासून ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या महिन्यांत चांगला पाऊस होतो आहे. यंदा तसे न झाल्यास आणि तोवर धरणे न भरल्यास संपूर्ण वर्षभर पाण्याचे संकट भेडसावू शकेल. त्यामुळे या दृष्टिकोनातून नियोजन व्हायला हवे.

पाऊस लांबल्याने राज्यात सुमारे २७०० गावांत आणि वाड्या-वस्त्यांत टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. चांगला पाऊस असलेल्या पुणे, सातारा, नाशिक, धुळे, नंदुरबार, रत्नागिरी, रायगड, ठाणे या जिल्ह्यांत टँकरची संख्या लक्षणीय आहे. याचाच अर्थ पाणी असूनही सुदूर आणि डोंगराळ भागांत ते पोहचविण्यासाठी पुरेशी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आलेली नाही. छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नांदेड, जालना, नगर, जळगाव या शहरांत काही ठिकाणी सहा दिवसांतून, तर काही ठिकाणी पंधरा दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होतो. गेल्या सुमारे दहा-वीस वर्षांपासून ही स्थिती असून, ती दिवसागणिक बिघडत चालली आहे. या काळात बहुतेक सर्व प्रमुख पक्ष राज्यात विविध आघाड्यांद्वारे सत्तेत राहिले. मात्र, पाण्याचा प्रश्न ते सोडवू शकले नाहीत. यातून त्यांची असंवेदनशीलता आणि या विषयाला त्यांच्या लेखी असलेले कमी महत्त्व स्पष्ट होते. येत्या काही दिवसांत मान्सून सक्रिय झाल्यास जलसंकटाची भीती आणि हे सर्व अपयश विसरले जातील. पावसामुळे वातावरण बदलेल, पेरण्यांची लगबग सुरू होईल, पाणीसाठा वाढू लागेल आणि सारे काही पूर्वपदावर येईल. मात्र, त्यानंतरही 'एल निनो'चा विचार करून आपत्कालीन नियोजनावर भर देणे हितकारक ठरेल.

## संपादकीय »

### अमेरिकी आरास!

***अखेर आपापल्या देशाची गरज हीच कोणत्याही परराष्ट्र व्यवहारांत महत्त्वाची. काही अत्यंत महत्त्वाचे तंत्रज्ञान करार मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात अपेक्षित आहेत...***

पूर्वी भारतात येणारा कोणताही महत्त्वाचा पाहुणा दौऱ्यानंतर वा दौऱ्याआधी पाकिस्तानला भेट देत असे. परंतु कालौघात एकापेक्षा एक भिकार नेत्यांनी पाकिस्तानास भिकेला लावले. परिणामी पाकिस्तान आता आंतरराष्ट्रीय व्यापारात कोणाच्या खिजगणतीतही नसतो. त्याची जागा आता त्यापेक्षा किती तरी बलाढ्य, धूर्त आणि दीर्घधोरणी अशा चीन देशाने घेतली. परिणामी भारतात अलीकडे येणाऱ्या महत्त्वाच्या पाहुण्यांचा एक डोळा शेजारी चीनवर असतो. हे सत्य लक्षात घेतले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाजत-गाजत साजरा होणाऱ्या अमेरिका दौऱ्याआधी त्या देशाचे गृहमंत्री अँथनी ब्लिंकेन यांची चीन भेट का आयोजित केली गेली हे सहजी लक्षात येईल. या भेटीचे महत्त्व आणखी एका कारणासाठी आहे. आपल्या चीन दौऱ्यात ब्लिंकेन हे फक्त त्यांच्या समकक्ष चिनी मंत्र्याला भेटले असते तर या भेटीचे कौतुक इतके झाले नसते. कोणत्याही अन्य दोन मंत्र्यांमधील ती भेट ठरली असती. पण तसे झाले नाही.

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपले तिमाही पतधोरण जाहीर करताना सातत्याने व्याजदर वाढवत नेले होते. गेल्याच आठवड्यात अनेक तिमाह्यांनंतर प्रथमच रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केली नाही. त्यामुळे, कर्जावरील व्याजदरांची संभाव्य वाढही टळली. दरवेळी रेपो दरात वाढ झाली की, सगळ्यांच बँका लगेच ठेवींवरील व्याजदर त्याच प्रमाणात वाढवत नाहीत.**

## घाऊक समाधान; किरकोळ दु:ख!

सातत्याने रेपो वाढत गेला तर ठेवींवरील व्याजदरही वाढत जातात. तसे गेल्या वर्षभरात अनेकदा झाले आहे. ही परिस्थिती दुधारी असते. एकीकडे, व्याजावर चरितार्थ चालणाऱ्या ज्येष्ठांना या वाढीचा आधार वाटतो. त्याचवेळी, कर्जे काढून उद्योग करणाऱ्या किंवा घरे विकत घेणाऱ्यांना वाढीव व्याजदराचा फटका बसत असतो. गेल्या आठवड्यात रेपो दरात बदल न होणे, हे एक सुचिन्ह होते. आता चलनवाढीचा दर उणे ३.४८ टक्के झाल्याचे जाहीरच झाले आहे. उणे चलनवाढ याचाच अर्थ घाऊक महागाई कमी होणे. जवळपास साडेतीन टक्क्यांनी घाऊक महागाई कमी होण्यामुळे अर्थकारणाला मोठीच चालना मिळण्याची शक्यता असते. उद्या पतधोरण बदलले आणि उद्योग कर्जावरील तसेच गृहकर्जावरील व्याजदर कमी झाले तर घरबांधणी तसेच इतरही उद्योग बहरतील. एक सुष्टचक्र सुरू करण्याची ताकद या उणे चलनवाढीत आहे.

भारताला इंधन तेलासाठी परस्वाधीन राहावे लागते आणि एका अर्थाने देशातील महागाईच्या नाड्या या तेल उत्पादक देशांच्या हातात जातात. सुदैवाने, युक्रेन युद्धाचा लाभ काही देशांना होतो आहे. रशियाला तेल विकून पैसा हवा आहे. भारताला तुलनेने स्वस्त तेल हवे आहे. हा उभयपक्षी फायद्याचा सौदा आहे. भारताने पश्चिम युरोप तसेच अमेरिका यांच्या



दबावाला बळी न पडता रशियाकडून होणारी तेलाची आयात गेल्या वर्षभरात जवळपास दुप्पट केली आहे. मे महिन्यात भारताला लागणाऱ्या एकूण इंधन तेलापैकी ४२ टक्के एकट्या रशियाकडून विकत घेण्यात आले आहे. मे महिन्यात भारताने १.९६ दशलक्ष बॅरल तेल विकत घेतले. हा आकडा एप्रिलपेक्षा १५ टक्के जास्त आहे. रशियाला युद्ध चालविण्यासाठी पैसा हवा आहे आणि तो भारत तसेच चीनला तेल विकून मिळतो आहे. हे तेल विकले जावे, यासाठी रशिया पश्मिय आशियातील नेहेमीच्या तेलोत्पादक देशांपेक्षा भारताला अधिक सवलत देतो आहे. स्वाभाविकच, भारताने आयात वाढवत नेली आहे. भारतामधील तुलनात्मक स्वस्ताईचे गणित हे असे आहे. अन्यथा, आजवरच्या इतिहासात भारताने अमेरिका, संयुक्त अरब अमिराती, इराक आणि सौदी अरेबिया यांच्याकडून होणाऱ्या एकत्रित तेल आयातीपेक्षा जास्त तेल रशियाकडून कधीही घेतले नव्हते.

## ॥ अभंगवाणी ॥



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महायुतीला तडे?

## बच्चू कडूनंतर सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केली जाहीर नाराजी

। नाशिक । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत केलेल्या बंडाला मंगळवारी ( २० जून ) एक वर्ष झालं. शिंदे-भाजपा सरकारचीही लवकरच वर्षपूर्ती होईल. पण, अद्याप सरकारचा दुसरा मंत्रिमंडळ विस्तार न झाल्याने आमदार आणि घटकपक्षही नाराज झाले आहेत. 'सरकारमध्ये मंत्रिमंडळ विस्तार करण्याची क्षमता नाही,' असं म्हणत आमदार बच्चू कडू यांनी शिंदे-फडणवीसांना घरचा आहेर दिला आहे. अशातच रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत यांनीही नाराजी व्यक्त केली आहे.**



### "मंत्रिमंडळ विस्तार 2024 नंतरच होणार"

**मंत्रिमंडळ विस्तारावरून बच्चू कडू यांनीही सतत जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. मंगळवारी ( २० जून ) प्रसारमाध्यमांना बोलताना बच्चू कडू म्हणाले, "मंत्रिमंडळ विस्ताराला एक वर्ष लागणार नाही, असं वाटत होते. पण, अद्यापही मंत्रिमंडळ विस्तार झाला नाही. ते दुर्दैवी असलं, तरी काही काम चांगली झाल्याने मंत्री केलं म्हणून नाराज नाही. मी नेहमी सांगतो, मंत्रिमंडळ विस्तार २०२४ नंतरच होणार आहे. ती क्षमता सध्या सरकारमध्ये नाही."**

"भाजपाला घटकपक्षाची अद्यापही आठवण झाली नाही. प्रत्येकाची वेळ येते. आम्ही वाट पाहतोय," असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं आहे. ते जालन्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### "...हे अद्याप समजलं नाही"

"सरकारबरोबर रासप, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, शिवसंग्राम आणि रयत क्रांती संघटना असे चार घटकपक्ष आहेत. आमचं सरकार आलं.

पण, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना घटकपक्षांची आठवण झाली नाही. बैठक बोलवायची की अजून आमचा नंबर आला नाही, हे अद्याप समजलं नाही," असं सदाभाऊ खोत म्हणाले.

### "आम्ही म्हणतोय भाजपाबरोबर आहे"

"आम्ही म्हणतोय भाजपाबरोबर आहोत. ते म्हणाले नाहीत, तुम्ही आमच्याबरोबर आहात. मात्र, आम्ही म्हणतोय भाजपाबरोबर आहे. प्रत्येकाची वेळ येते. तेव्हा प्रत्येकाला संधी मिळत असते. आम्ही वाट पाहतोय," असं सदाभाऊ खोत यांनी म्हटलं.

---

# डबे १०८, खर्च ९८९ कोटी; मेट्रो ६ मार्गिकेवर १८ गाड्यांची तयारी सुरु

। मुंबई । महाईन्यूज

स्वामी समर्थनगर ते विक्रोळीदरम्यान उभारण्यात येत असलेल्या मेट्रो ६ मार्गिकेवरील १८ गाड्यांची तयारी मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सुरू केली आहे. यामध्ये १०८ डब्यांचा समावेश असेल. त्यावर ९८९ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

मेट्रो ६ ही पश्चिम उपनगरांना पूर्व उपनगरांशी जोडणारी उन्नत मार्गिका आहे. १५.८ किमी लांबीच्या या मार्गिकेवर एकूण १३ स्थानके आहेत. या स्थानकांदरम्यान सहा डब्यांची मेट्रो धावणार आहे. या मेट्रोचे डबे पुरविण्यासह त्यांची चाचणी करणे व मेट्रो चालकांना प्रशिक्षण देण्यासाठी एमएमआरडीएने निविदा काढली आहे. निविदेनुसार, प्राधिकरण पहिल्या टप्प्यात १०८ डबे खरेदी करणार आहे. सहा डब्यांनुसार



एकूण १८ गाड्या याअंतर्गत मागविल्या जात आहेत. त्यासाठी ९८९.८७ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. संबंधित कंत्राटदाराला हे डबे यशस्वी चाचणीसह तसेच चालकांच्या प्रशिक्षणासह १५९ आठवड्यांत पुरवायचे आहेत. ३१ जुलै २०२३ ही निविदा भरण्याची अंतिम तारीख आहे. या मेट्रो गाडीच्या सहा डब्यांची एकूण प्रवासी हाताळणी क्षमता २,२८० इतकी असावी. त्यामध्ये ३१६ प्रवासी बसू शकतील. तसेच कमाल ताशी १५० किमी, सरासरी ताशी ९० किमी व वळणदार रस्त्यावर सरासरी ताशी ३५ ते ५० किमी वेगाने ही गाडी धावू शकणारी असावी, असे एमएमआरडीएने म्हटले आहे.

# वाहनं बिनधास्त पळणार, चौकांमधील कोंडी फुटणार!

## नवी मुंबईत खड्डेमुक्तीसाठी 63 चौकांचे काँक्रिटीकरण

। नवी मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'खड्डेमुक्त रस्ते आणि चौक' ही संकल्पना राबवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सन २०१२-१३मध्ये मुंबई महानगर प्रदेशातील सरकारी प्राधिकरणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले होते.**

'खड्डेमुक्त रस्ते आणि चौक' ही संकल्पना राबवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सन २०१२-१३मध्ये मुंबई महानगर प्रदेशातील सरकारी प्राधिकरणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले होते. त्यानुसार, नवी मुंबई महापालिकेने शहरातील ७८ चौकांच्या काँक्रीटीकरणाचे काम हाती घेतले होते. त्यापैकी ६३ चौकांचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले असून उर्वरित १५ चौकांचे कामही वेगाने सुरू आहे. काँक्रीटीकरणामुळे पावसाळ्यात रस्त्यांवर आणि चौकांच्या परिसरात पडणाऱ्या खड्डयांपासून मुक्ती मिळणार आहे. यामुळे चौकांमध्ये आणि पर्यायाने शहरातील अंतर्गत रस्त्यांवर होणारी वाहतूककोंडी आता फुटणार आहे. महापालिका क्षेत्रातील चौकांमध्ये होणारी वाहतूककोंडी टाळण्यासाठी चौकासभोवतीच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. प्राधान्यक्रमानुसार आतापर्यंत शहरातील एकूण ८८ चौकांपैकी ६३ चौकांचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. यामध्ये बेलापूर विभागाततील



सात, नेरूळ विभागातील २१, वाशी विभागातील चार, तुर्भे विभागातील १०, कोपरखैरणे विभागातील तीन, घणसोली विभागातील १४, ऐरोली विभागातील चार चौकांचा समावेश आहे. दरवेळी शहरातील चौकांमध्ये पावसाचे पाणी साचून तिथे खड्डे पडण्याचे प्रकार मोठ्या संख्येने होत असतात. रस्त्यावर खड्डे पडल्याने तिथे वाहतूककोंडी होऊन संपूर्ण शहरात वाहतुकीचा बोजवारा उडतो. हजारो वाहनांना याचा फटका बसतो. मात्र यावेळी काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाल्यामुळे ही परिस्थिती उद्भवणार नाही, असे चित्र आहे.

## करिना आणि शाहिद कपूर पुन्हा एकत्र येणार ? नेटकऱ्याच्या कमेंटला दिलेल्या उत्तराची जोरदार चर्चा

अभिनेता शाहिद कपूर आणि करिना कपूर या जोडीचा २००७ मध्ये आलेला 'जब वी मेट' हा चित्रपट गाजला. शाहिद-करिनाची केमिस्ट्री, कथा-पटकथा, संवाद आणि गाणी या सगळ्याला प्रेक्षक आणि समीक्षकांची दाद मिळाली.

करिनाला 'गीत' या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कारही मिळाला, तर शाहिदच्या 'आदित्य' या भूमिकेचंही कौतुक झालं. हे सगळं आठवायचं कारण असं, की या चित्रपटाच्या सीक्वेलची तयारी सुरू असल्याची चर्चा आहे.

शाहिद-करिना हे बॉलिवूडचं ऑन स्क्रीन- ऑफ स्क्रीन फेव्हिरेट कपल होतं. पण मधल्या काळात त्यांच्यात दुरावा निर्माण झाला आणि दोघांनीही पडद्यावर आणि पडद्यामागेही पुन्हा एकत्र यायचं नाही हा ठाम निश्चय केला होता. पण एकाच इंडस्ट्रीत असं करून चालणार नाही हे दोघांनीही कळून चुकलं असावं, त्यामुळं त्यांनी रडत खडत का होईना पण काही प्रोजेक्ट्स एकत्र केलेत. ब्रेकअपनंतर ते 'मिलेंगे मिलेंगे' या चित्रपटात एकत्र दिसले होते.

करिना, शाहिद किंवा दिग्दर्शक इम्तियाज अलीनं त्याबद्दल काही भाष्य केलेलं नाही. मात्र, शाहिदनं एका चाहत्याच्या कमेंटला रिप्लाय दिल्यानं ही चर्चा सुरू झाली आहे. 'तू



## मराठी कलाकार म्हणतायत, 'पटलं तर घ्या..', काय आहे भानगड?



सोशल मीडिया हे एक असं माध्यम आहे जिथे एकाच प्लॅटफॉर्मवर सर्वसामान्यांपासून सेलिब्रिटींपर्यंत सारेच एकत्र नांदतात. इथे प्रत्येकजण आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यातील अनेक गोष्टी शेअर करताना दिसतात. चाहते आणि सेलिब्रिटी यांच्यातील एक उत्तम धागा म्हणजे हा सोशल मीडिया.

इथे सेलिब्रिटींनी एखादी पोस्ट केली की ती लागलीच व्हायरल झालीच पाहिजे. किंवा एखादा हॅशटॅग त्यांनी वापरला की तो ट्रेन्ड झालाच पाहिजे. सध्या ट्वीटर आणि इन्स्टाग्रामवर 'पटलं तर घ्या..' हा हॅशटॅग ट्रेन्ड होताना दिसतोय. अन् 'पटलं तर घ्या..' नक्की काय भानगड आहे यावरनं तर्क वितर्क लावले जात आहेत.कलाकार अनेकदा एखादा हॅशटॅग वापरतात तो त्यांच्या नव्या कलाकृतीविषयी अंदाज देणारा असतो.



## "मला जाऊ द्या", रश्मीकाचा तोरा...घाईत निसटली

रश्मिका मंदाना आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांचा 'मिशन मजनू' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. दुसरीकडे, मंगळवारी मुंबईत या चित्रपटाचे स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये चित्रपटाच्या स्टारकास्टसह अनेक स्टार्सनी हजेरी लावली होती. यादरम्यान रश्मिका 'मिशन मजनू'च्या स्क्रिनिंग ठिकाणच्या बाहेर चाहत्याची माफी मागताना दिसली.

रश्मिकाने तिचा सहकलाकार सिद्धार्थ मल्होत्रासोबत 'मिशन मजनू'च्या स्क्रिनिंगला हजेरी लावली होती. त्याचवेळी कियारा अडवाणी आणि करण जोहरही स्क्रिनिंगला पोहोचले. रश्मिका कार्यक्रमस्थळी पोहोचताच चाहत्यांची गर्दी झाली. एका पापाराझीने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये रश्मिका स्क्रिनिंग ठिकाण सोडून कारमध्ये जाताना दिसत आहे.

यादरम्यान अभिनेत्रीने तिच्या सर्व वाट पाहणाऱ्या चाहत्यांना खूप गोंडस स्माईल दिली. यादरम्यान तिची कार गर्दीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करताना दिसली. अभिनेत्रीच्या ड्रायव्हरने गर्दीचा सामना करण्याचा प्रयत्न केला, परंतु रश्मिकाला पापाराझी आणि चाहत्यांच्या सुरक्षेची देखील काळजी होती. यादरम्यान ती त्यापैकी एकाची माफी मागताना दिसली. अखेर तिची गाडी गर्दीतून बाहेर निघाली.

मिशन मजनू'च्या स्पेशल स्क्रिनिंगसाठी रश्मिका कॅज्युअल आउटफिटमध्ये पोहोचली होती. अभिनेत्रीने निळा स्लीव्हलेस क्रॉप टॉप घातला होता आणि हिरव्या रंगाच्या पँटसोबत पेयर केला. तिने स्क्रीनिंगपूर्वी कॅमेऱ्यांसाठी पोज दिली आणि प्रीमियरला जाण्यापूर्वी पापाराझींशी गप्पा मारताना देखील दिसली.

'मिशन मजनू' हा रश्मिकाचा बॉलिवूडमधील दुसरा चित्रपट आहे. या स्पाय थ्रिलरमध्ये रश्मिका एका भारतीय गुप्तहेराच्या प्रेमात पडलेल्या पाकिस्तानी मुलीची भूमिका साकारताना दिसणार आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. रश्मिका लवकरच अल्लू अर्जुनसोबत 'पुष्पा 2' या मोस्ट अवेटेड चित्रपटात दिसणार आहे.

## शाळांमध्ये लैंगिक शिक्षण आवश्यक; रकुल प्रीत सिंग

'डॉक्टर जी' चित्रपटात अखेरची दिसलेली बॉलिवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंह लवकरच 'छत्रीवाली'मध्ये दिसणार आहे. दोन्ही चित्रपट महिलांच्या प्रजनन आरोग्यावर आधारित आहेत. एका पोर्टलशी संवाद साधताना रकुल प्रीत शाळांमध्ये लैंगिक शिक्षणाचे महत्त्व याबाबद्दल बोलली, तसेच कुठेतरी आपल्याला लैंगिक शिक्षणाचे महत्त्व समजते परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते असेही ती म्हणाली.

'छत्रीवाली' चित्रपटाचा ट्रेलर तो आवश्यक आहे आणि म्हणूनच तो पुस्तकांचा आणि अभ्यासक्रमाचा भाग असल्याचे सांगतो, असे रकुल म्हणाली. अभिनेत्री म्हणाली, “मी जसजशी मोठी होत गेले, तसतसे मी विचार करत राहिले की लैंगिक शिक्षण ही काळाची गरज आहे आणि ते महत्त्वाचेही आहे. लैंगिक शिक्षण तुम्हाला नैसर्गिक मानवी प्रगती समजून घेण्यास मदत करते. आपण त्यापासून पळून जाऊ शकत नाही."



याबद्दल प्रत्येकाला माहिती असणे खूप गरजेचे असल्याचे अभिनेत्रीने सांगितले. यासोबतच हे जाणून घेण्यासाठी योग्य वय काय आहे हेही सांगितले. रकुल म्हणाली, "मुल 13-14 वर्षांच्या वयात यौवनात प्रवेश करते आणि हीच वेळ असते जेव्हा त्यांना त्यांच्या लैंगिक आरोग्याशी संबंधित सर्व गोष्टी जाणून घेणे आवश्यक असते."

या अभिनेत्रीने असेही सांगितले की जेव्हा हे शाळेत शिकवले जाते तेव्हा बहुतेक लोक या विषयावर बोलण्यास टाळतात. तिच्या बालपणीची कहाणी सांगताना रकुल म्हणाली, “मला वाटतं त्या वेळी मी नववीच्या वर्गात असेन. त्यावर आम्ही हसायचो. आम्हाला लाज वाटायची. आम्हाला आमच्या शिक्षकांना याबद्दल काही विचारावे असे वाटत नव्हते. वर्ग कधी संपेल असा प्रश्न पडायचा".

# थरारक लढतीत अखेर ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर विजय!

## उस्मान ख्वाजा ठरला गेमचेंजर : 65 धावांची खेळी साकारत विजयात मोलाचा वाटा उचलला

। बर्मिंगहम ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशा निराशेच्या हिंदोळ्यावर रंगलेल्या इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिल्या कसोटीचा शेवटही रंजक झाला. हा सामान कोण जिंकेल हे कोणालाही सांगता येत नव्हते. पावसाने पहिल्या सत्रात खेळत होऊ दिला नव्हता. पण तरीही ऑस्ट्रेलियाने हार मानली नाही आणि उस्मान ख्वाजाने संघाला विजयाचे स्वप्न दाखवले.**




ख्वाजाने ६५ धावांची खेळी साकारत विजयात मोलाचा वाटा उचलला खरा, पण मोक्याच्या क्षणी तो बाद झाला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स आणि नॅथन लायन यांनी संघाला विजय मिळवून दिला. ऑस्ट्रेलियाने पहिल्याच कसोटीत इंग्लंडवर दोन विकेट्स राखून विजय मिळवला, या विजयासह त्यांनी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. पॅट कमिन्सने यावेळी नाबाद ४४ धावांची झुंजार खेळी साकारली. पाचवा दिवस हा दोन्ही संघांसाठी महत्वाचा होता. पण पाचव्या दिवसाच्या सुरुवातीलाच वरुण राजाचे आगमन झाले आणि त्यामुळे पहिल्या सत्राचा खेळ स्थगित करण्यात आला. पण दुसऱ्या सत्रात मात्र सामन्याला सुरुवात झाली आणि प्रत्येक षटकात चाहत्यांची उत्कंठा वाढवत होता. दुसऱ्या सत्राची सुरुवात ऑस्ट्रेलियाने चांगली केली. उस्मान ख्वाजा यावेळी खेळपट्टीवर नांगर घेऊनच आला होता. कारण या सत्रात त्याने फक्त आणि फक्त बचाव करण्यावर भर दिला. यावेळी नाइट वॉचमन म्हणून आलेल्या स्कॉट बोलंडने ४० चेंडू खेळत खेळत काढले आणि ख्वाजाला चांगली साथ दिली. पण यावेळी पुन्हा एकदा स्टुअर्ट ब्रॉड इंग्लंडच्या मदतीला धावून आला. कारण त्याने इंग्लंडला आजच्या दिवसाची पहिली विकेट मिळवून दिली. त्यानंतर ट्रेव्हिस हेड आणि कॅमेरून ग्रीन हे फलंदाजीला आले खरे. पण या दोघांकडून आश्वासक खेळी पाहायला मिळाली नाही. हेड आणि ग्रीन हे दोघेही अनुक्रमे १६ आणि २८ धावांवर बाद झाले.

ऑस्ट्रेलियाचे फलंदाज बाद होत होते, पण त्यावेळी चाहत्यांच्या नजरा खिळलेल्या होत्या त्या उस्मान ख्वाजावर. कारण ख्वाजा हा एक असा खेळाडू त्यावेळी होता जो सामना फिरवू शकत होता. ख्वाजाने आपले अर्धशतक झळकावले. त्यानंतर तो शतकाच्या दिशेने वाटचाल करत होता. यावेळी इंग्लंडच्या विजयाच्या मार्गात तो अडसर बनू पाहत होता. त्यामुळे इंग्लंडचा संघ त्याला बाद करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत

### 43 वर्षांनी प्रथमच असं घडलं

इंग्लंडच्या संघाला पहिल्याच कसोटीत चांगला घाम फोडला तो ऑस्ट्रेलियाच्या उस्मान ख्वाजाने. पहिल्या डावात ख्वाजाने शतक झळकावले होते. त्यानंतर आता इंग्लंडच्या विजयाच्या मार्गात तो मोठा अडसर बनला आहे. पण ख्वाजाने दोन्ही डावात दमदार फलंदाजी करताना एक भन्नाट विक्रम आपल्या नावावर केला आहे. तब्बल ४३ वर्षांनी क्रिकेटच्या इतिहासात ही गोष्ट प्रथमच घडली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा जर कोणता एक खेळाडू इंग्लंडला भिडला असेल तर तो आहे ख्वाजा. कारण ख्वाजाने इंग्लंडच्या नाकी नऊ आणले आहेत. पहिल्या डावात जेव्हा ऑस्ट्रेलियाचे दिग्गज खेळाडू बाद होत होते तेव्हा ख्वाजाने शतक झळकावले होते. त्यानंतर दुसऱ्या डावात इंग्लंडने त्यांना २८१ धावांचे आव्हान दिले आणि त्यानंतर चार विकेट्स नंतर त्यांचा डाव अडचणीच आला होता. पण ख्वाजाने संघाचे फलंदाज एकामागून एक बाद होत असताना खेळपट्टीवर ठाण मांडला आणि त्याने संघाला विजयाचा मार्ग दाखवला. ख्वाजाने यावेळी अर्धशतकही झळकावले. पण ख्वाजाच्या नावावर आता एक भन्नाट विक्रम जमा झाला आहे. गेल्या ४३ वर्षांत कोणत्याही खेळाडूला ही गोष्ट जमली नव्हती. या पहिल्या कसोटी सामन्यात ख्वाजा हा पाचही दिवस फलंदाजी करत असल्याचे समोर आले आहे. या सामन्यातील पाचही दिवस तो खेळपट्टीवर होता आणि ऑस्ट्रेलियाच्या विजयासाठी दमदार फलंदाजी करत होता.

---

## बंगालमधील सौरव गांगुलीच्या जमिनीवर कब्जा, फोनवरही केली शिवीगाळ; पोलिसात तक्रार दाखल

। कोलकाता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली यांच्याबद्दल एक बातमी समोर येत आहे. पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्याच्या पोलिसांनी भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीच्या जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण केल्याच्या तक्रारीचा तपास सुरू केला आहे. गांगुलीच्या स्वीय सचिव तान्या भट्टाचार्य यांनी ही तक्रार दाखल केली असून, त्यांनी दावा केला आहे की, दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील महेशतला पोलिस स्टेशनच्या अंतर्गत असलेल्या भागात सुप्रियो भौमिक नावाच्या व्यक्तीने गांगुलीच्या क्रिकेट अकादमीच्या नावावर नोंदवलेल्या जमिनीवर अलीकडेच अतिक्रमण केले होते. तक्रारीत, गांगुलीची स्वीय सहाय्यक तान्या भट्टाचार्य यांनी म्हटले



आहे की, एक व्यक्ती आणि त्याचे सहकारी बळजबरीने कुलूप तोडून जमिनीवर ताबा मिळवण्याचा सतत प्रयत्न करत होते. घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका सुरक्षा रक्षकाने त्यांना रोखण्यासाठी हस्तक्षेप केल्यावर त्यांच्यावर हल्ला करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिस तक्रारीत भट्टाचार्य म्हणाले की, सुरक्षा कर्मचाऱ्यांचा सामना करताना भौमिक आणि त्यांच्या काही साथीदारांनी शिवीगाळ केली. आरोपीने फोनवरही बोलताना तिच्यासोबत गैरवर्तन केल्याचे भट्टाचार्य यांनी तक्रारीत म्हटले आहे.

## डेव्हिड वॉर्नरने मोडला वीरेंद्र सेहवागचा मोठा विक्रम, कसोटी क्रिकेटमध्ये टाकले मोठे पाऊल

। लंडन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कसोटी मालिका ही चांगल्या रंगतदार वळणार आहे. ऑस्ट्रेलियाला हा सामान जिंकण्याची चांगली संधी आहे, असे म्हटले जात आहे. यासाठी कारणीभूत ठरला आहे तो वॉर्नर. कारण इंग्लंडने ऑस्ट्रेलियापुढे विजयासाठी जेव्हा २८१ धावांचे आव्हान ठेवले तेव्हा त्यांना चांगल्या सुरुवातीची गरज होती आणि ही गोष्ट वॉर्नरने चोख बजावली.**



वॉर्नरने उस्मान ख्वाजाच्या साथीने संघाला अर्धशतकी सलामी दिली होती. त्यामुळे या विजयासाठी मजबूत पाया ऑस्ट्रेलियाला ठेवता आला होता. वॉर्नरने संघाला फक्त चांगला पाया रचून दिला नाही तर त्याने सेहवागचा एक मोठा विक्रमही मोडीत काढला आहे.

सेहवाग जेव्हा फलंदाजीला यायचा तेव्हा गोलंदाजांच्या पायाखलची जमिन सरकली जायची. कारण सेहवाग हा फार कमी वेळात जास्त धावा करायचा आणि त्यांच्या हातून सामना खेचून न्यायचा. हीच गोष्ट वॉर्नरबाबतही पाहायला मिळाली. वॉर्नरही धडाकेबाज फलंदाजी करत कमी वेळात जास्त धावा करण्याता तरबेज आहे. त्यामुळे वॉर्नरने पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावात जी खेळी साकारली ती ऑस्ट्रेलियासाठी महत्वाची ठरली. वॉर्नरने पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावात ५७ चेंडूंत ३६ धावा केल्या आणि यामध्ये चार चौकारांचा समावेश होता. या खेळीसह वॉर्नरने आता सेहवागचा एक विक्रम मोडीत काढला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून वॉर्नरने ८२०८ धावा केल्या आहेत. सेहवागच्या नावावर कसोटी सलामीवीर म्हणून ८२०७ धावा होत्या आणि त्यामुळेच आता वॉर्नरने सेहवागचा हा विक्रम मोडीत काढला आहे. पण या यादीत अव्वल स्थानावर आहे तो इंग्लंडचा माजी कर्णधार ॲलिस्टर कुक. कुकने कसोटी क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून ११,८४५ धावा केल्या आहेत.

वॉर्नरने आता सेहवागचा कसोटी क्रिकेटमधील विक्रम मोडीत काढला आहे. त्यामुळे वॉर्नर यापुढे आता कोणते अजून विक्रम आपल्या नावावर करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.